## प्रकरण चौथे

## ' महानंदा ' मावशींची एक प्रातिनिधिक वेदना

## प्रकरण चौथे

## महानंदा : भाविणींची एक प्रातिनिधिक वेदना

---

× कादंबरीकार जयवंत दळवी ×

---

एक प्रथितयश कादंबरीकार म्हणून मराठी वाचकांत जयवंत दळवी सुपरिचित आहेत. मानवी जीवन आणि माणसाच्या मनोव्यापारांचे विश्लेषण करणा-या त्यांच्या चक्र, स्वगत, ऋणानुबंध, आल्बम, अथांग, वेडगळ, अंधाराच्या पारंब्या, धर्मानंद, महानंदा यासारख्या कादंब-या महत्वाच्या आहेत. या सर्वच कादंब-यांतून सामाजिक पातळीवर शोधाच्या दिशेने व्यक्त झालेली दळवींची लेखननिष्ठा प्रकट होते. म्हणून त्यांच्या या साहित्याला गंभीर प्रकृतीचे मूल्य प्राप्त झाले आहे, असेच म्हणावे लागते. त्यांच्या कादंबरीत वावरणारी व्यक्ती मग ती गरीब - श्रीमंत, शहरी - ग्रामीण कोणतीही असो त्यांच्या समाजातील आंतरिक अनुभवातून, चिंतनातूनच त्यांनी ती रेखाटली आहे. कादंबरीत स्थान मिळालेली व्यक्ती प्रसंगी आपल्या वाटयाला आलेले जीवनानुभव अतिशय निकराने सुसहय करण्याच्या प्रयत्नात हतबल किंवा उध्वस्त होते. किंबहुना आपल्या संचिताला सामोरे जात असताना नियतीसमोर हात टेकून आलेले प्रसंग रेटत, दु:खभार हलका करणा-या, प्राक्तनभोग भोगणा-याच अनेक व्यक्ती त्यांनी रेखाटल्या आहेत. त्या व्यक्तींच्या अंत:करणात समस्येतून निर्माण होणारे दु:ख आणि जीवनाला सामोरे जाताना समोर येणारे प्रश्नच त्यांना दिसतात. हे प्रश्न घेऊन समस्येशी संघर्ष करणा-या, दु:खाशी झगडणा-या व्यक्ती या दळवींच्या अवतीभवती त्या त्या परिस्थितीत या ना त्या स्वरूपात वावरलेल्या आहेत, त्या त्यांच्या अनुभवातील आहेत. म्हणून ते म्हणतात, ' आपले अनुभव जे कादंबरीत उतरतात ते ढोबळ मानाने दोन प्रकारचे असतात. बाहय अनुभव आणि आंतरिक अनुभव या दोन्ही अनुभवांशी आपले भावनिक संबंध असतात. पण आंतरिक अनुभव हे भावनामयच होऊन गेलेले असतात. शिवाय त्यावर आपल्या विचारशक्तीचे संस्करण झालेले असते. आणि ते बव्हंशी आपल्या नकळत झालेले असते. बाहय अनुभव आपण घेतो तेव्हा त्याचे दर्शनी स्वरूप आपण अधिक स्वीकारलेले असते. असा अनुभव आपण बाळपणी आणि तरूणपणी अधिक घेतो, असे मला वाटते. या वयात आपण भावनिक असतो पण तर्कशुध्द विचार करण्याची आपल्यात कुवत नसते. या वयात पाहिलेली घरं, मंदिरं, स्थळं आणि व्यक्ती

त्यांच्या दर्शनी रूपानं अधिक स्वीकारतो. एक गोष्ट खरी की ज्याचे धागे - दोरे आपण कधीच पाहिलेले, ऐकलेले नाहीत असं ' संपूर्ण नवीन ' आपण काहीच निर्माण करू शकत नाही. आपल्या कल्पनाशक्तीच्या त्या मर्यादा आहेत. (1)

सामाजिक रूढी - बंधनात जखडलेल्या स्त्रिया कौटुंबिक, सामाजिक वातावरणात दबकून वावरत असतात. मनाचा कोंडमारा होत असतानाही परिस्थितीने त्या आगतिक आणि असहाय बनतात. अपरिहार्यपणे त्या तशाच मनस्वी आक्रंताने जगत असतात. त्यांच्या या दुःखाचे खरे कारण सामाजिक प्रश्नच असतात. काही सामाजिक प्रश्न सामूहिक चळवळीने कदाचित सुटू ही शकतील. पण परंपरेने आलेल्या निति - नियमात जखडून गेलेली एखादी व्यक्ती तिच्या समोरील सामाजिक चौकट ओलांडूच शकत नाही. आपल्या अंतर्यामीचे दुःख स्वतःच कुरवाळत ती जगत - भोगत असते. विशिष्ट परिस्थितीत अशा व्यक्तीचे व्यक्तिगत जीवन हे सामूहिक पातळीवर ' प्रातिनिधिक ' ठरणारे असते. म्हणूनच तिला परंपरागत सामाजिक चौकट मोडून जगणे हे समाजद्रोह ओढवून घेण्यासारखे ठरते. अशा व्यक्तीला स्वतःच्या दुःखाशी स्वतःच झगडून मानसिक कोंडमा-यात जगावे लागते. या दुःखाची तीव्रता ते दुःख निर्माण करणा-या सामाजिक प्रश्नाशी निगडित असते. हेच दुःख लेखकाने साहित्यात उतरवले तर ते साहित्य अधिक कसदार होऊ शकते. ' दीर्घकाल टिकणा-या साहित्यात व्यक्ती, व्यक्तीचे प्रश्न, व्यक्तीचे दुःख यालाच प्राधान्य असते. ' (2)

तसे पाहिले तर जयवंत दळवी हे कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील आरवली या खेडेगावात जन्मले आहेत. मुंबईत येण्यापूर्वी वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत ते तेथे वाढले आहेत. दारिद्रयाची सुबत्ता आणि निसर्गाची संपन्नता लाभलेल्या या प्रदेशातील भुकेकंगाल दुर्दैवी माणसेच त्यांच्या अवतीभवती वावरत होती. बुध्दिमान पण गरीब माणसे अनेक सामाजिक रूढी - बंधनात जखडलेली होती. या वातावरणात जगणा-या स्त्रियांचे दुःख हे अधिकच तीव्र. प्रत्यक्ष जयवंत दळवींच्या घरातील स्त्रिया देखील वर्षभर घरातून बाहेर पडत नव्हत्या. भावीण, देवळी, मंगेशी यासारख्या देवदासीही अपार मानसिक यातना सहन करत या भागात जगताना आढळतात. अशासारख्या स्त्रियांच्या दुःखाचा प्रभाव दळवींच्या साहित्यिक मनावर पडला नाही तरच नवल ! आपल्या आयुष्यातील सत्तावीस वर्षे अमेरिकन संस्कृतीत घालवूनही त्यांच्या साहित्यात हिंदू स्त्रियाच आल्या आहेत. म्हणूनच ते म्हणतात, ' दोनदा मी अमेरिकेत जाऊन आलो तेथील कुटुंबे मी जवळून पाहिली. त्या कुटुंबात मी राहिलो पण त्या स्त्रिया माझ्या लेखनात कधी आल्या नाहीत. माझ्या लेखनात स्त्रिया आल्या त्या प्रामुख्याने हिंदू समाजातल्या. मध्यमवर्गीय, आपल्या रूढी, आपला भोंदूपणा, मागासलेपणा यांना सतत बळी पडणा-या स्त्रिया ! याचे कारण माझे मन ! अशा बळी जाणा-या स्त्रियांच्या सहवासात मी लहानाचा मोठा झालो. ' (3)

दळवींच्या अनेक कादंब-या कोकण आणि मुंबईतील समाज जीवनाशी निगडित आहेत. कारण तेथील अनुभवच त्यांच्या रक्तात पूर्णपणे भिनलेले आहेत. त्यामुळेच प्रादेशिक जीवन जाणिवेशी निगडित साहित्य निर्मितीसाठी त्यांची लेखणी कार्यरत राहिली आहे. आपण अनुभवलेला अर्थपूर्ण जीवनानुभव व्यक्त करताना त्यांची वृत्तीही चिंतनशील बनली आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होणा-या जीवनानुभवामध्ये एक प्रकारची मूल्यविषयक जाणीवही आढळते. त्यासाठी त्यांचे निष्ठापूर्वक चिंतन आणि त्यांनी साहित्यिक जाणिवेने घेतलेला शोध महत्वाचा आहे. ' त्यांच्या शोधाच्या काही वाटा आहेत. एका वाटेवर माणसांच्या स्वभावात विशिष्ट परिस्थितीने, राहणीने, व्यवसायाने, परिसराने जो विक्षिप्तपणा शिरतो त्यातील वैचित्र्याच्या अवलोकनाने ते रंजकतेचे ताटवे फुलवीत राहतात. यावेळी देखील वाचकांना जाणवेल या पध्दतीने ते मूळ शोधाचे अवधान सांभाळीत राहतात. या वाटेवरचे त्यांचे लेखन दिसायला रंजक पण पुन्हा पाहिले तर सत्वयुक्त वाटते. दुस-या वाटेवर त्यांना परिस्थितीतील काही घटकांचे संस्कार अमर्याद झाले की त्यातून फुटणा-या विकृतीच्या वेली दिसतात. त्या दाट, टणक बनतात. माणसाची अंतःकरणे जखडून टाकतात. वेडीविद्री बनवतात. या नादात चाललेल्या आयुष्यातून केविलवाण्या ' **यातना झिरपू लागतात.** [4]

**' महानंदा ' कादंबरीचे कथानक :**

नुकताच एम.ए. होऊन प्राध्यापक झालेला बाबुल दिवाळीच्या सुटीत मामाच्या गावी येतो. मुंबईच्या वातावरणातून आलेला तो कोकणच्या निसर्गसानिध्यात रमतो. तेथे नकळतच कल्याणी भाविणीची मुलगी ' महानंदा ' हिच्या प्रेमात तो पडतो. पण सामाजिक बंधनामुळे भावीणकन्येशी जुळलेल्या या प्रेमाची दारूण वाताहत आणि बाबूल - महानंदा यांच्या जीवनाची क्रूर चेष्टा होते. नियतीच्या फे-यात तो आणि त्याची प्रेयसी महानंदा एकमेकापासून दूरवर फेकले जातात. हे या कादंबरीचे खरे तर आशयसूत्र. ' महानंदा ' हीच या कादंबरीची नायिका आहे. त्यांच्याबरोबरच बाबुलचा मामा, मामी, कल्याणी आणि लखोबा ही या कादंबरीत वावरणारी इतर पात्रे नियतीच्या चक्रात पूर्ण पिळून निघाली आहेत. परिस्थितीने हतबल झालेल्या या सर्वांचे जीवनच अगदी निरर्थक झाले आहे. भावनेतून वेदनेची परिसीमा दाखवणा-या प्रसन्न शब्दकळेतील ही कादंबरी सुरुवातीपासूनच वाचकांची उत्कंठा कायम ठेवून अंतःकरणाला झोंबत जाते.

सामाजिक रूढी - बंधनामुळे हळुवार प्रेमाची होणारी वाताहतच अतिशय सूचकतेने मांडून या कादंबरीची सुरूवातच लेखकाने आकर्षक व चित्तवेधक केली आहे. ' बोट बंदराला लागली. घसा

खरवडून डरकाळी फोडावी तसा तिनं भोंगा दिला. भोंग्याचा आवाज काही क्षण ' देवळाच्या घुमटीत घुमावा ' तसा घुमला. ' ही वाक्यरचनाच ' हाती आलेले सुख एखाद्याच्या हातून नियती हिरावून नेत आहे ', असे सूचित करते. तर गर्द हिरव्या झाड फांद्यावर हिरवेगार पोपट बसले आहेत असा भास व्हावा आणि बंदुकीचा बार होऊन पोपटांचा थवाच उडून जावा आणि झाडफांद्या निष्पर्ण, उजाड दिसाव्यांत या वाक्य रचनेतूनच कादंबरीत घडणा-या घटना या सुखदु:खाच्या सीमारेषेवरून जाऊन दु:खालाच जवळ करावे लागणार आहे हेच सुचवितात.

बोट बंदराला लागते आणि समोर डाव्या बाजूला डोंगरावर डाक बंगला दिसतो. या बैठया कौलारू बंगल्याचे बाबुलला अगदी पहिल्यापासून आकर्षण होते. बाबुलच्या भावजीवनाशी जणू काही तो आपले नातेच सांगत होता. म्हणूनच हा डाकबंगला या कादंबरीत अधूनमधून येऊन जातो. बाबुल मामाच्या गावी आल्या आल्या **बंदरातूनच** त्याला त्या डाकबंगल्याचे दर्शन होते. कादंबरीत अधूनमधून धूसर, ढेपाळल्यासारखा, थिजल्यासारखा, अस्पष्ट तर कधी चक्क ऐटबाज असा तो डाकबंगला दाखवला आहे. बाबुलच्या प्रेमाच्या आणि दु:खाच्या भावस्पंदनांचा जणू काही त्याच्यावरच परिणाम होतो आहे असे वाटते. कादंबरीच्या अगदी शेवटी दमयंतीला घेऊन जाताना त्याला तो दिसतो. तो दिसतो पण कसा? त्याला निरोप द्यायला बंदरावर आलेल्या महानंदेच्या अगदी माथ्यावरच । आणि हेच अतिशय वाईट आणि करूणाजनक आहे. कारण आपल्या मधुचंद्रासाठी याच बंगल्यात यावे असे त्याला वाटत होते. किमान एक तरी चांदणीरात्र मानू बरोबर (महानंदा) या बंगल्यात घालवायची. चंद्राच्या दुधात बुडून जायचे. अशी त्याची तीव्र इच्छा होती. पण अखेर पांढ-या काठीसारखी निस्तेज दिसणारी मानू शेवटी त्याला निरोप द्यायला येते आणि थेट तिच्या माथ्यावरच बाबुलला तो डाकबंगला दिसतो याच्यासारखे दुर्दैव ते कोणते ?

हे दुर्दैव केवळ सामाजिक बंधनामुळेच प्रेमात झालेल्या फसगतीने त्याच्यावर ओढवलेले आहे. या फसगतीतील प्रमुख सूत्रधार म्हणून ' कल्याणी ' भाविणीचा उल्लेख करावा लागेल. देहात आणि वृत्तीत सुखलीनता असलेली, मुंबईतून एखाद्या बंगल्यातून बाहेर पडली असती तर जुन्या, श्रीमंत, खानदानी घराण्यातील बाई शोभली असती. सरळ टक लावून पाहणे कठीण जावे इतकी ती देखणी होती. आपण ' भावीण ' असे ती बाबुलला स्वत:च सांगते आणि तुझ्या आज्यानेच आम्हाला मोठे केले असे म्हणते. ' आमचं घराणं पूर्वापार तुमच्या घराण्याला लागलेलं, ' असे म्हणत बाबुलला विडा **द्यायचा** आपला धर्म ती पाळते. आणि त्याच वेळी ती म्हणते, ' हयो आमचा धर्म आमच्या जीवात जीव असेवर करणार.

आताच्या मुली कुठं करतात. आताच्यांना लगीन होया. नरकाची लक्षणं ! भावणीच्या पोरीनं देवाचे पाय सोडून लगीन केलं तर देव डोळे फोडील ना आमचे ! " परंपरेने चालत आलेला आपला भाविणीचा धर्म ती अगदी अंधश्रध्देने पार पाडत आहे, असेच दिसते. आताच्या पोरी भावणीचा धर्म सोडून लग्न करतात म्हणून तिला बेंबीच्या देठापासून खंत वाटते.

महानंदेचे सौंदर्य आणि तिच्या लाघवी बोलण्यानं तिच्याकडे ओढला जाणाऱ्या बाबुलला हाच भाविणीचा धर्म आणि त्यातून निर्माण होणारे दुःख नकळतच महानंदा बोलून दाखविते. एका उत्कट प्रसंगी बाबुल तिच्याजवळ लग्नाचा विषय काढतो त्यावेळी बेरकीपणाने ती म्हणते, " मी भावणीची मुलगी. देवदासी. तुम्ही मोठया कुळातले ! पण बाबुल हे ऐकतच तिच्या अंतर्यामीचे दुःख ओळखतो. जातीपेक्षा माणूस महत्वाचा. जिव्हाळयाची नाती निर्माण झाली की जात बाजूला फेकली जाते. याची पुसटशी का होईना पण त्याला जाणीव आहे म्हणूनच पटकन तो म्हणतो, " असू दे ! जन्माने येणारे मोठेपण आणि कमीपण मी मानत नाही. "

पुढे वाढत जाणाऱ्या संपर्कातून, संबंधातून दोघेही लग्न करण्याचा निर्णय घेतात. महानंदेच्या आईच्या मनाविरुध्दचा हा निर्णय होता. कारण ती म्हणायची, " आपण देवाच्या, देवाचे पाय सोडून आपण जर लग्न केले तर आपलं कधीसुध्दा कल्याण होणार नाही. " पाप – पुण्याच्या समजुतीवर तिच्या मनात जुने विचार होते. आईचे ते विचार म्हणजे एक खुळी समजूत आहे हे महानंदा पूर्णपणे ओळखून होती. म्हणूनच ती नव्या बदलासाठी, परिवर्तनासाठी सिध्द झाली होती. आईने विरोध केला तर बाबुल सांगेल त्या ठिकाणी, सांगेल त्यावेळी त्याच्याबरोबर पळून जायचा ती निर्धार करते.

एक दिवस बाबुल कल्याणी जवळ विषय काढतो आणि आपण महानंदेशी लग्नाला तयार असल्याचे सांगतो. पण कल्याणी अगदी तटस्थपणा दाखवत हसते. भावणीच्या पोरीला लगीन ? असा आश्चर्ययुक्त प्रश्न ती विचारते. भावणीच्या मुलीनं लग्न केला तर देवाचा कोप होणार. भावणीजवळ जाऊन येऊन असावं. त्याला देवाची मना नाय. भावीण ठेवली तर देवाचा कोप नाय होत असे ती म्हणते. पुढे बाबुलला समजावण्यासाठी ती म्हणते, " लग्नाच्या फंदात तू पडू नको, तिला पाडू नको. देवाचा कोप म्हणजे दगडावरची रेघ. माझी पोर मसणात गेली तर मला नाय चिंता. मला चिंता तुझ्या कल्याणाची. अगदी शपथेवर पुढे ती म्हणते, " तुझी इच्छा असली तर तू वर्षातून दोनदा येणा जाणा कर. तिला पेजेपुरता काय ना काय दे ! "

पुढे आपल्या कर्मावर हवाला ठेवून महानंदा बाबुल बरोबर पळून जायला तयार होते. बाबुल देवाचा प्रसाद (कौल) घेतो. नारायण गुरव देवासमोर गा-हाणे घालतो. पण कौल मनासारखा मिळत नाही. महानंदेला समजावून सांगून परत येण्यासाठी बाबुल मुंबईला निघून जातो.

केवळ महानंदेसाठीच बाबुलने मुंबईतील नोकरी सोडली आणि नागपुरात मिळवली. महानंदेशी लग्न करुन सरळ नागपूरला जाण्याचा त्याचा विचार होता. म्हणून तयारीसाठी त्याने महानंदेला पत्र पाठवले व स्वतः तिला नेण्यासाठी तो पाठोपाठ येतो. पण त्याआधीच त्याने पाठवलेले पत्र सोमजी पोस्टमास्तरने फोडून कल्याणीला वाचून दाखविले होते. कल्याणी ताबडतोब महानंदेला पिंगुळीला घालवते. आलेल्या बाबुलशी खोटे बोलते. तिला पाचवा महिना असल्याचे सांगून तिने बाबुलला फसवल्याचे सांगते. आपल्या जातीत भाविणींना ' पेजेला देणार तो शेजेला घेणार ' हाच भाविणीचा जन्म. रागाऊ नकोस. आवड नावड आम्हाला काही उपयोगाची नाही असे ती पुढे म्हणते आणि येथूनच पुढे बाबुल आणि महानंदेच्या जीवनाची फरपट सुरु होते.

नियतीने मांडलेल्या अशा दारुण फरपटीत अतिशय विचित्र अवस्थेत बाबुल आणि महानंदा आपआपल्या पातळीवर जगत असतात. तशीच वीस वर्षे निघून जातात. मामाच्या मृत्यूनंतर मामीला भेटण्यासाठी म्हणून बाबुल पुन्हा गावी येतो. या वेळी त्याला समजते की ' महानंदा ' ही आपल्या मामांची मुलगी आहे. केवळ देवाधर्मापायीच त्यांनी कल्याणीशी लग्न केले नाही. या भेटीतच बाबुलची महानंदेशी भेट होते. संपूर्ण तारुण्य ओसरुन पांढ-या सडसडीत काठीप्रमाणे ती दिसत होती. बाबुलपासून झालेली ' दमयंती ' ही मुलगी तिने जपून सांभाळली होती. यावेळी अतिशय भावना वेगाने केरसुणीप्रमाणे कोप-यात बसत ती म्हणते, " देवाच्या नावाने सगळयांनीच माझा गळा कापला. ' तुमची जातच तसली. तुम्हीच मला फसवले ', अशीच माझी आईने समजून करुन दिली. तुम्हाला पत्र लिहिले पण ते सोमजी पोस्टमास्तरने फाडून टाकले. माझ्या आयुष्याचा सत्यानाश केला. मुलाबाळांची, संसाराची आशा होती. मी तुम्हाला फसवलं नाही. आतून जळत जगत आले ".

एका वेगळयाच भावसंवेदनेने अस्वस्थ करुन टाकणा-या या कादंबरीतील सर्वच पात्रे आपल्या जीवनाचा डाव हरवून गेलेली आहेत. देवाधर्मापायी भाविणीशी लग्न न करता कल्याणीत रमलेले मामा, मामाला ओढ लावू न शकलेल्या, सतत उदास छायेत वावरणा-या अपत्यहीन मामीचे भग्न जीवन काय किंवा आवडाबायमध्ये सुख शोधत जगणारा भाबडा लखोबा काय सगळेच या संसारातील जुगाराच्या डावात हरल्यामुळे चाचपडत आपले दिवस घालवत आहेत.

× " महानंदा : भावीण जीवनाच्या होरपळीची

एक प्रादेशिक कादंबरी ×

अल्पाक्षरी शब्दांच्या वापरातून एकापाठोपाठ एक प्रसंग उभा करणारी जयवंत दळवी यांची ही एक महत्वाची कादंबरी आहे. कोकणच्या वातावरणात उलगडत जाणारे या कादंबरीचे कथानक सामाजिक आणि वाङ्‌मयीन दृष्टीनेही महत्वाचे आहे. मामांच्या घराशी आपल्या तीन पिढयांचे नाते सांगणारी कल्याणी ही कोकणातील एक " भावीण ", भावीणकन्या म्हणून ज्याप्रमाणे तिचे नाते आईशी होते त्याप्रमाणेच तिचे अस्तित्व तिच्या मुलीशी बांधले गेले होते.

मुळात जयवंत दळवींचे बालपण कोकणात गेले आहे. कोकणात आढळणाऱ्या आणि परंपरेचा बळी ठरणाऱ्या भाविणींचे जीवन आणि त्यांचे दुःख त्यांनी अनुभवले आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक रूढीबंधनाने आपले अस्तित्वच परस्वाधीन करणाऱ्या या भाविणींच्या जीवनाशी संबंधित अर्थपूर्ण आशयसूत्र दळवींना सापडले ते त्यामुळेच । अशा समाजात जन्माला येणाऱ्या आणि जन्मजात रूपसंपन्न असलेल्या स्त्रियांच्या जीवनाची होरपळ कशी होते याचे चित्रण त्यांनी उत्कट पातळीवर अतिशय परिणामकारकपणे या कादंबरीत केले आहे. या चित्रणामागे समाजविषयक जाणिवेने त्यांनी केलेले चिंतनच महत्वाचे वाटते. कारण अशा चिंतनाशिवाय अल्पाक्षरात बांधला गेलेला हा महान आशय सहजासहजी कोणाला शक्य होणार नाही. म्हणूनच या कादंबरीला एक प्रकारचे सामाजिक आणि वाङ्‌मयीन मूल्य प्राप्त होते. जीवनाच्या फरपटीत आतून जळून जगणाऱ्या महानंदेच्या मनाची होरपळ का झाली ? या प्रश्नावर संबंध " भावीण धर्म आणि त्या धर्माशी बांधील राहून अंधश्रद्धेने आपले पारंपरिक जीवन जगणारा भाविणींचा वर्गच समोर येतो. मग " महानंदा " ही या ठिकाणी व्यक्तिगत पातळीवर आपले जीवन जगणारी एक स्त्री राहत नाही. तर तिच्या जीवनात तिच्या समाजातीलच तिच्यासारख्या अनेक महानंदांच्या प्रेमाची वाताहत होऊन जीवनाची झालेली फरपट आढळते. म्हणून ती त्यांची " " प्रतिनिधी " ठरते.

भाविणींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण चांगला नसतो. त्यांच्यामते पुरूषांना भुरळ पाडून त्यांना ओढ लावणाऱ्या त्या स्त्रिया असतात. अनेकांचे संसार मोडणाऱ्या, वाईट चालीच्या त्या असतात. म्हणून सर्वांनीच त्यांच्यापासून चार पावलं दूर राहिले पाहिजे, ही त्यांच्या विषयीची समजूत

मनात घर करुन असते. पण तसा विचार केला तर भाविणी या केवळ त्यांचे परंपरागत जीवन जगत असतात. स्वतःच्या उपजीविकेसाठी म्हणूनच त्यांना आपल्या जीवनात कोणाचा तरी भक्कम आधार शोधावा लागतो. तो एखाद्याचा आधार मिळाला तर त्यांचे सुदैव नाहीतर त्यांना वारांगनाच बनावे लागते. असे जगत असताना मनातून उध्वस्त झालेल्या एखाद्या पुरुषाच्या जीवनात सुखाचे चार क्षण त्या निर्माण करतात. या कादंबरीतील बाबुलचे मामा कल्याणीच्या नादी लागले म्हणून बाबुलची आई, मामी तिचा दुस्वास करतात. पण मामाच्या आयुष्यात जे सुखाचे चार क्षण दिसतात ते कल्याणी मुळेच. म्हणूनच तर रात्री – अपरात्री आपले मन शांत करण्यासाठी ते तिच्या घरी जातात. पण या ठिकाणी मामाला ओढ लावू न शकलेली मामीच समाजाच्या सहानुभूतीचा विषय ठरते. आणि त्यांना ओढ लावून सुख देणारी कल्याणी भावीण मात्र वाईट दिसते. कारण ती परंपरेने निर्माण झालेल्या परिस्थितीची बळी असते.

वास्तविक या भाविणींबद्दल समाजात आपुलकी निर्माण झाली पाहिजे, अशी परिस्थिती दिसते. कारण समाजानेच आपल्या स्वार्थीवृत्तीतून देवाच्या नावाखाली भाविणींना " सोडले " आहे. त्यांचा विशिष्ट वर्ग, संस्था निर्माण केली आहे. सामाजिक रुढीबंधनामुळे विशिष्ट चौकटीच्या बाहेर त्या येऊच शकत नाहीत. आई भावीण म्हणून मुलीला देवाला सोडायचे (वाहायचे) लग्न करायचे नाही ते पाप असते असे तिच्या मनावर बिंबवायचे. " पेजेला देईल तो शेजेला घेईल " या म्हणीप्रमाणे उपजीविकेसाठी जो मदत करील त्याच्या मनासारखे वागून त्याचे चोचले पुरवायचे. पण समाजातल्या एखाद्या प्रतिष्ठितापासून झालेल्या मुलांना आपल्या मागे त्याचे नाव लावता येत नाही. आपल्या जन्मदात्यासारखे, त्याच्या मुलांसारखे त्यांना वागता येत नाही. तर फक्त देवाची सेवाचाकरी करत त्यांनी दिवस घालवायचे. मुलगी असेल तर आपल्या उपजीविकेसाठी काही देणारा " यजमान " मिळेपर्यंत आपल्या आईजवळ राहायचे. अन्यथा वारांगनेचे जीवन जगायचे ही परंपरा. बाबुलपासून झालेल्या दमयंतीला जपून ठेवण्यासाठी महानंदेला अपरिहार्यपणे तो मार्ग स्वीकारावा लागला आहे.

परंपरेच्या बळी ठरलेल्या कल्याणीची आई, कल्याणी, महानंदाबद्दल आपल्या मनात कीव निर्माण होते. त्यांच्याविषयी करुणाही उत्पन्न होते. कल्याणी ही तर देवधर्माबाबत इतकी अंधश्रध्द आहे, की आपल्या प्रमाणेच महानंदेनेही राहिले पाहिजे, तिचे लग्न होता कामा नये नाहीतर देवाचा कोप होईल, ते पाप ठरेल असे तिला वाटते. आणि म्हणूनच तिचे लग्न होऊ नये या हट्टाला पेटते. शेवटी तिच्या हट्टाग्रहानेच महानंदेच्या जीवनाची बाबुलपासून फारकत होते. खरे तर ही भावीण संस्थेत जगणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाची शोकांतिकाच ठरते. ती महानंदेच्या पातळीवर आपणाला ठळकपणे

जाणवते. ही शोकांतिका परंपरेने चालत आलेली आहे. " महानंदा " मध्ये प्रथम कल्याणीची " आई ", " कल्याणी ", " महानंदा ", " दमयंती " पर्यंतच्या भाविणींच्या पिढयांचे जीवन चित्रण येते. या जीवनावर परंपरा, श्रध्दा यांचा कसा जबरदस्त पगडा होता हे कळते. (5)

भावीण जीवनाशी संबंधित असणा-या या संपूर्ण कादंबरीला कोकणची निसर्गरम्य पार्श्वभूमी मिळालेली आहे. सामाजिक बंधनाने जखडलेली महानंदा " भावीण " ही देवदासीच. अकल्पितपणे भेटलेल्या बाबुलवर तिचे प्रेम बसते आणि बाबुल व महानंदा एका भावसंबंधात बांधली जातात. पण या हळुवार जुळव्या प्रेमीजीवांचा सामाजिक रुढीबंधनाच्या कडयावरुन भीषण कडेलोट होतो. त्यांच्या नाजूक भावना ढोंगी, अंधश्रध्द समाजाच्या वातावरणात इतस्ततः विखुरल्या जातात. सामाजिक बंधनाने प्रेमाचीच वाताहत होते. म्हणजेच ही कादंबरी जनजातिविषयक प्रश्नाचे चित्रण करत कोकणच्या पार्श्वभूमीवर घडत गेली आहे. ती प्रादेशिक स्वरुपाची आहे. भावीण धर्माशी निगडित अनेक प्रसंग लेखकाने या कादंबरीतून चित्रित केले आहेत. प्रादेशिक कादंबरीतील जनजातीविषयक कादंब-यांमधून ते जीवन रंगविताना प्रमाण भाषेचाच उपयोग केलेला आढळतो. त्या त्या जातीनिष्ठ व व्यवसाय संबध्द अशा शब्दांच्या योजनेने वातावरण निर्मिती साधण्याचा प्रयत्नही केलेला आढळतो. परंतु अशा कादंब-यांमध्ये " बोली भाषा " नाही म्हणून त्या कादंब-यांची प्रादेशिकता काही नष्ट होत नाही. कारण त्या कादंब-यांतील प्रादेशिकत्व हे त्यांच्यातील जीवनप्रणालीशी संबध्द असते. (6) मात्र कोकणी बोलीतील अनेक शब्द अधूनमधून या कादंबरीत आढळतात. उदा. बापसाने, आवशी, झील, जेवणाक, सोडण, प्रसाद घेणे, पेजेक इत्यादी. योग्य त्या ठिकाणी वापरलेल्या या शब्दांमुळे कादंबरीतील वातावरण निर्मिती चांगली साधली आहे. शिवाय पूर्णपणे बोलीभाषेतच ती लिहिली असती तर शब्दांच्या माहिती अभावी अनेक वाचकांना ती दुर्बोध्य वाटली असती. समजण्यास कठीण झाली असती.

प्रादेशिक कादंबरीही ख-या अर्थाने वास्तवावर आधारलेली असते. ज्या प्रदेशात कादंबरी घडते त्या प्रदेशातील एखादी समस्या, त्या समस्येतून निर्माण होणारे दुःख, काही प्रश्न आणि तेथील जनजीवन हाताळले जाते. कोकणच्या पार्श्वभूमीवर तेथे आढळणा-या भाविणींच्या समस्या आणि जीवनाच्या संदर्भातच या कादंबरीचे कथानक पुढे सरकत गेले आहे. भाविणीचा विवाह ही कल्पना त्या अंधश्रध्द समाजाला न पटणारी होती. ते पापकृत्यच होय असे समजले जात होते. या प्रश्नाचा उल्लेख बाबुलच्या मामीच्या तोंडून बाहेर येतो. ती एकदा बाबुलला म्हणते, " भावीण ठेवण्यापेक्षा केलेली बरी ... कसं ? " यावर बाबुलनाथ म्हणतो, " देवाचं धर्माचं नडतं ना ? तेव्हा मामी भडकून

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

म्हणते, आग लागो देवाच्या तोंडाला. कसला रे देव ? उगाचच नाचायचं. आम्ही कुठं काय देवाचं वाकडं केलं ? तर आमचं काय बरं झालं ? जन्मभर चूल फुंकली आणि खरकटी काढली. देव आणि धर्म असं म्हणणा—या मामीची सारी वेदनाच यातून व्यक्त झाली आहे. कारण " मामां " चा संबंध " कल्याणी " भाविणीशी होता. या देवदासीची तरी अवस्था काय ? पेजेला देणार तो शेजेला घेणार. अशी वीस वर्षानंतर बाबुल होळीच्या रात्री देवळातली पालखी पाहतो. तेव्हा त्याला पूर्वीच्या श्रध्दाळूपणाचा अभाव जाणवतो. कारण तेथे पूर्वीसारखी लोकांची रीघ नसते. शे—दोनशे लोक दारु पिऊन धुळवड करीत असतात. (7) वीस वर्षाच्या कालावधीत त्या ठिकाणच्या बदलत गेलेल्या लोकजीवनाचेच हे चित्र होय. ते दिसत असतानाच आपल्या जीवनात पूर्ण अनर्थ भरलेल्या मामीच्या दुःखाची नाळ भाविणीपर्यंत जाऊन भिडली आहे तर कल्याणी भाविणीच्या दुःखाची नाळ समाजव्यवस्थेच्या उदरापर्यंत जाऊन भिडली आहे हे समजते. म्हणूनच वाचणा—याच्या मनात ही कादंबरी एक प्रकारची अस्वस्थ कालवाकालव करते.

या कादंबरीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे जयवंत दळवींनी वापरलेली अप्रतिम भाषाशैली. अतिशय नेमके आणि अर्थपूर्ण शब्द वापरून त्यांनी या कादंबरीला एक वेगळेच सामर्थ्य मिळवून दिलेले आहे. अतिशय नेमकेपणाने केलेले निवेदन या कादंबरीला एक वेगळाच उठाव प्राप्त करून देते. संयमाने आलेल्या अनेक वाक्यांतील नेमकी सूचकताही लेखकाच्या लेखन कौशल्याची ताकद दाखविणारी ठरते. उदा. 'बोटीच्या भोंग्याचा आवाज 'देवळाच्या घुमटीत घुमावा' तसा घुमला' (महानंदा 2) हे या कादंबरीच्या पहिल्याच परिच्छेदात आलेले वाक्य कादंबरीतील दुःखद घटनांचे सूचन करणारेच ठरते. तर अगदी शेवटी बाबुलला निरोप द्यायला बंदरावर आलेल्या महानंदाकडे पाहून लिहिलेले 'थेट तिच्या माथ्यावर डाकबंगला दिसत होता' (महानंदा 128) हे वाक्य चित्ताचा थरकाप उडवणारे आहे. आयुष्यातील स्वप्नभंगाने कळाहीन झालेल्या जीवनाचे कारूण्य व्यक्त करण्यासाठी या ओळीतील ताकद प्रचंड आहे.

अगदी अंधाराच्या छायेत वावरणारी मामी मामाच्या वाडयातील भयाण अर्थशून्यताच दाखवत होती. अपत्यहीन मामीचा पती भाविणीच्या आहारी गेला होता. त्यामुळे तिच्या दुःखाची झालर अधिकच कारुण्याने भरलेली आहे. पण हेच दुःख अल्पाक्षरातील एकाच ओळीतून लेखक व्यक्त करतो. " पूर्वी कित्येकांची वार आणि नाळ या खोलीच्या जमिनीत पुरली गेली असेल, पण अलीकडे योग आला नाही. " कल्याणीच्या आणि मामीच्या घरातील जाणवणारे वेगळेपण दळवी अतिशय सहजपणे लिहितात.

कल्याणीच्या घराचे वर्णन करताना ते म्हणतात, " तेथील दगडी खांब सुध्दा बोलू लागेल. झाड – पाला सुध्दा सुवास टाकेल. (**महानंदा - 46** ) म्हणजेच सदाबहार असलेल्या कल्याणीच्या घरात सुख, शांती, तृप्ती ओसंडून वाहताना बाबुलला जाणवते पण मामीच्या घरात मात्र दुःख, अशांती आणि अतृप्तताच आहे असे त्याला वाटते.

भाविणीच्या जीवनाशी संबंधित असूनही या कादंबरीत भडक शृंगाराचे दर्शन आढळत नाही. तर हळुवार भावसंवेदना उत्कट शब्दात अगदी नेमकेपणाने व्यक्त झाल्या आहेत. म्हणूनच प्रसन्न शब्दकळा लाभलेली ही कादंबरी वाचकाला मोहवून टाकते. बाबुल आणि महानंदेच्या संबंधातील एक भावस्पर्शी प्रसंग दाखवतातना ते लिहून जातात, " ती माझ्या अंगातच सामावून गेली. कलम झाली. डोळे, ओठ, जिभ, श्वास सारं सारं एक होऊन गेलं ".( **महानंदा -48**) तर अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका प्रसंगात अतिशय संयमानं शृंगार दर्शन त्यांनी घडवलं आहे. " मी तिला बघत राहिलो. बघता बघता बेभान झालो. सगळं विसरुन तिच्यावर झडप घालणार तोच ......
तिचं तोंड उचललं ......
तिच्या नथीचा मोतिया स्पर्श मोठा वेधक वाटला.
....... काढू नथ ? नको ।
ओठांचा चोळामोळा झाला ......
जागता जागता कधी पहाट झाली ते कळलंच नाही. ( **महानंदा - 70** )

अशा प्रकारच्या शृंगाराचे वर्णन एका मर्यादेत आणि अतिशय संयमानं दळवींनी केले आहे. म्हणून या कादंबरीचे पावित्र्य टिकले आहे. नाहीतर या कादंबरीची दिशाच बदलली असती.

नायक – नायिकेच्या जीवनाला जबरदस्त धक्का देऊन त्याची विपरित परवड करणारा प्रसंग देखील अगदी नेमक्या आणि नेटक्या शब्दात त्यांनी व्यक्त केला आहे. महानंदेला आपल्याबरोबर घेऊन जाण्यासाठी आलेल्या बाबुल व कल्याणीतील संवाद या दृष्टीने पाहण्यासारखा आहे.
" काय झालं ? झालं तरी काय ? "
मी आवाज चढवून विचारलं.
' तिला बरं नाय रे ...... दिवस गेलेत तिला ...... '
चटकन आतून कुठं तरी काळजावर नाजूक पीस फिरलं.
दोन महिन्यापूर्वी रंगलेल्या रात्री ......
' कितवा ...... ? '

एवढा एक शब्द टाकताना सुध्दा मी लाजलो आणि
तोंडावरनं हातरुमाल फिरवला.
' पाचवा ! ! '
' पाचवा ? ' ......
जीव जाता जाता एक शब्द तोंडातून निसटावा तसा तो निसटला. ( महानंदा - 85 )

दोघांच्या जीवनात कमालीची उलथा पालथ घडवणाऱ्या या प्रसंगाची उभारणी करताना दळवींनी अत्यंत संयमाने शब्दरचना केली आहे.

पुन्हा वीस वर्षानंतर बाबुल आणि महानंदा प्रत्यक्ष भेटतात तेव्हा तारुण्य ओसरलेल्या महानंदेचे वर्णन करताना ते म्हणतात, " कोपऱ्यात फिक्कट पांढरी सडसडीत काठी उभी होती. " तर जीवनातील डाव उधळलेल्या आणि आपल्या सौंदर्याने अनेकांना वेड लावून वेड लागलेल्या कल्याणीला बाबुल पाहतो तेव्हा ती " बिट बिट बघत होती "

भावीण जीवनाशी संबंधित एक सामाजिक महत्वाचा विषय हाताळून शब्दांच्या सामर्थ्याने वाचकांना अस्वस्थ करुन सोडणारी ही कादंबरी आकाराने तशी लहान आहे. खरेतर एखादी दीर्घकथा वाटावी अशी ही कादंबरी आहे. मात्र प्रत्यक्षात एखाद्या दीर्घ कादंबरीची संभाव्य शक्ती तिच्यात आहे. तिच्या अंतरंगात प्रचंड ताकद लपलेली आहे. ही कादंबरी वाचत असताना वाचकाला वरवर दोन प्रेमी जीवांची प्रेमाच्या विफलतेमुळे त्यांच्या आयुष्यात झालेली फरपट जाणवते. काव्यात्म आणि अल्पाक्षर रमणीय भाषेतील ही कादंबरी रंजक वाटते पण प्रत्यक्षात या कादंबरीच्या अंतःकरणात गंभीरमूल्य लपलेले आहे असे वाटते. कादंबरीचा आशय हाताळताना दळवींनी प्रादेशिक पातळीवरच्या एका समजिक प्रश्नालाच हात घातलेला आहे. कारण समाजातील दुष्ट प्रवृत्तीच्या एखाद्या खलनायकामुळे या कादंबरीतील प्रेमी युगुलाच्या प्रेमात विफलता निर्माण झालेली नाही. तर सामाजिक धर्म, रुढी, परंपरा हेच त्यांच्या प्रेमाच्या विफलतेला आणि दोघांच्या आयुष्याच्या उध्वस्ततेला कारण ठरते. प्रेम हा विषय या ठिकाणी रंजक आहे हे खरे. पण त्याच्या आत एक सामाजिक प्रश्न लपलेला आहे हे ही तितकेच खरे. म्हणूनच रंजकतेतून दळवींनी एका महत्वाच्या सामाजिक प्रश्नाच्या शोधाचे अवधान सांभाळले आहे. या कादंबरीतून प्रत्यक्षात त्यांनी कोकणातील आपला जीवनानुभवच व्यक्त केला आहे. ' भावीण ' हा कोकणातील एक देवदासीचा प्रकार. या कादंबरीची नायिका महानंदा आणि तिची आई कल्याणी यांच्या रुपाने कोकणात असणाऱ्या भाविणींच्या सामाजिक जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन त्यांनी घडविले आहे.

या कादंबरीत भाविणींच्या चार पिढयांचा उल्लेख करुन ' भावीण ' हा धर्म पारंपारिक पध्दतीने कसा चालत आलेला आहे ते दळवी दाखवतात. कारण कल्याणी ज्या वेळी या कादंबरीचा नायक बाबुल याला देवळात प्रथम विडा देते आणि आपण ' विडा देण्याचा धर्म ' पाळत आहोत असे त्याला सांगते. त्याचवेळी बाबुलच्या मामाच्या घराण्याशी कल्याणीच्या आधीपासून भाविणीने विडा देण्याची पध्दत आहे हे तिच्या बोलण्यातून जाणवते, आणि पुढे कल्याणीची आई, कल्याणी, महानंदा व दमयंती या भाविणींच्या चार पिढया आपल्या धर्म–कर्माशी जखडून उभ्या असलेल्या आपणाला दिसतात.

आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी केवळ पोटापाण्याची व्यवस्था करणा–याची ' ठेवलेली ' म्हणून राहणे हेच या ठिकाणची भावीण पसंत करते. स्वतः एखाद्या पुरुषाशी लग्न करावे आणि आपला संसार थाटून गृहस्थी जीवनाचा स्वीकार करावा, आपल्या मुला–बाळात रमावे हा आपणाला हक्कच नाही. तसे केले तर ते फार मोठे पाप आहे हे जणू काही या भाविणींच्या मनावर पूर्णपणे बिंबले आहे. म्हणूनच त्या पापपुण्याच्या चक्रात पूर्णपणे अडकून एका विशिष्ट सामाजिक रिंगणात फिरत आहेत.

परिवर्तनाच्या प्रवाहाचे वारे लागून डोळसपणे समाजाचे आणि आपल्या जीवनाचे निरीक्षण करुन एखादी नव्या विचाराची भावीण कन्या लग्नाचा विचार करु लागली तर त्यांच्या जुन्या /नव्या पिढीत पापपुण्याच्या पातळीवर फार मोठा संघर्ष घडतो. समाजात कोणतेही परिवर्तन घडत असताना संघर्ष हा होणारच, तो अटळ असतो ही वस्तुस्थिती आहे. नव्या बदलांचे वारे लागलेल्या तरुण भाविणींना जुन्या परंपरेशी घट्ट चिकटून असणा–या भाविणी आपल्या परंपरागत व्यवसायापासून बाहेर पडू देत नाहीत. मग त्या दोन पिढयांच्या दरम्यान एखादा नवाच सामाजिक तणाव उभा राहतो असे चित्र दिसते. हा तणाव फक्त पापपुण्याच्या कल्पनेशीच फार चिकटून असतो. स्वतःच्या सुखासाठी आपला पारंपारिक व्यवसाय सोडून देण्याची त्यांची मानसिक तयारी नसते, हेच प्रामुख्याने दिसते. या कादंबरीची नायिका महानंदा हिच्याशी आपली लग्न करण्याची इच्छा आहे असे जेव्हा बाबुल म्हणतो तेव्हा कल्याणी एकदम अस्वस्थ होते. पण आपली ही अस्वस्थता ती बाबुलला चटकन जाणवू देत नाही. मनातून तो दुखावू नये अशी तिची इच्छा असते. या लग्नापासून त्याला परावृत्त करण्याचा ती प्रयत्न करते. " भाविणीच्या पोरीने देवाचे पाय सोडून लग्न केले तर देव डोळे फोडील ना ? अशी ती आपली प्रतिक्रिया व्यक्त करते. या ठिकाणी पापपुण्याच्या पातळीवर जुने विचारच तिच्या मनात पक्के आहेत हे जाणवते. आपल्या माथी मारलेले परंपरेचे जिणेच आपण जगले पाहिजे, असे तिचे पक्के मत बनले आहे. आपण देवाची पूजा करावी, गाभारा स्वच्छ करुन

समईचा ढळढळीत प्रकाश पाडावा, बाहेर सारे स्वच्छ, सुंदर करुन कोप—यातल्या एखाद्या केरसुणी – प्रमाणे आपले जीवन जगावे. हे जगत असताना पोटाला दोन वेळची पेज मिळण्यासाठी ती देणा—याची शेज सजवावी. हेच आपले खरे जगणे आणि हीच आपली नियती आहे या मताशी भावीण चिकटून असते, हेच कल्याणीच्या वागण्या—बोलण्यातून दिसते.

अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणाने भाविणी आपले जीवन अगतिकपणे जगत असतात. जगण्यासाठी त्यांना समाजाच्या पातळीवर अनैतिक स्वरुपाचे वर्तन करावे लागते पण त्यांच्यासाठी ते वर्तन नैतिकच ठरत असते. तो त्यांचा धर्मच असतो असे त्या समजतात. म्हणूनच कल्याणी ही बाबुलला महानंदेशी लग्न करण्याच्या विचारापासून परावृत्त करते. मात्र तिच्याशी संबंध ठेवायला तिची हरकत नसते. किंबहुना त्या दोघांचे संबंध जुळून यावेत, बाबुलने तिला ठेवावी अशीच तिची इच्छा असते. म्हणून कादंबरीत अगदी सुरुवातीपासूनच त्या दोघांचा एकत्र सहवास घडवण्याचा ती प्रयत्न करताना दिसते. पण पुढे बाबुलला ती म्हणते, तिच्याशी लग्न करुन कसे चालेल ? भाविणीच्या मुलीला कुठले आले आहे लग्न ? इच्छा असली तर वर्षातून एक—दोनदा येणे जाणे ठेव. तिला पेजेपुरते काहीना काही दे. म्हणजेच तिचा चरितार्थ चालव. आम्हा भाविणींना आवड – नावड उपयोगाची नाही. या ठिकाणी एक सुलक्षणी, सुशिक्षित बुध्दिमान तरुण आपल्या मुलीवर अनुरक्त आहे याची जाणीव कल्याणीला आहे. आपली मुलगी आयुष्यभर सुखा—समाधानात त्याच्या जवळ राहू शकेल असे चित्र तिला स्पष्ट दिसते. पण पाप—पुण्याच्या कल्पनेमुळे आपल्या परंपरागत रीतिरिवाजामुळे ती मनातून घाबरते. म्हणूनच त्या दोघांचे लग्न होऊ नये यासाठी मुद्दामहून प्रयत्न करते. दोघांमध्ये परस्पराविषयी गैरसमज निर्माण करते. खोटा बनाव करुन दोघांना एकमेकांपासून अलग करते. यात सात्विक वृत्तीची अवखळ महानंदा आणि प्रेमळ वृत्तीचा कर्तृत्ववान बाबुल या दोघांच्या आयुष्याची कमालीची फरपट होते. ही फरपट कल्याणी भाविणीच्या अंध धर्मश्रध्देमुळेच झालेली आहे. अशा अंध धर्मश्रध्देच्या अतिरेकामुळे एखाद्याच्या संपूर्ण आयुष्याची ससेहोलपट कशी होते हे प्रकर्षाने येथे जाणवते. शिवाय अज्ञान, अंधश्रध्दा आणि धर्मभोळेपणा यात भाविणींचे जीवन कसे खितपत पडले आहे हे ही प्रामुख्याने आपणाला जाणवते. मग हे जीवन भाविणींच्या एका कुटुंबापुरतेच येथे मर्यादित राहत नाही तर ते त्या समाजाचे ' प्रातिनिधिक ' जीवन दर्शनच आपणाला घडवते. या कादंबरीत आलेली जुन्या पारंपरिक विचारांशी घट्ट चिकटून असलेली कल्याणी काय किंवा परिवर्तनाच्या नव्या विचारांचा स्पर्श झालेली पण जुन्या व्यवस्थेची नाळ तोडू न शकलेली महानंदा काय त्या अंधश्रध्द समाजव्यवस्थेच्याच बळी ठरलेल्या आहेत. म्हणून ' भावीण '

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

जीवनाच्या ' प्रतिनिधी ' म्हणूनच त्या आपल्यासमोर येथे उभ्या राहतात.

याच बरोबर पुन्हा हा प्रश्न समाजांतर्गत इतर भागात कसा शिरकाव करतो आणि समाजातील इतर घटकांवर त्याचा कसा परिणाम होतो याचे वास्तव चित्रणही येथे झालेले आहे. निसर्गदत्त सौंदर्य लाभलेल्या या भाविणी आपल्या सौंदर्याने नकळतच समाजातील पुरुषांना वेड लावतात. अनेक पुरुष विशिष्ट परिस्थितीत त्यांच्या आहारी जातात. आणि मग त्या पुरुषांचे त्यांच्या कुटुंबाकडे, स्वतःच्या बायको–मुलांकडे दुर्लक्ष होते. स्वतःला शांत करण्यासाठीच असे अनेक पुरुष भाविणींचा उंबरठा झिजवतात. त्यांच्यावर आपला जीव उधळतात. आपल्या उपजीविकेसाठी असा एखादा पुरुष आपल्याशी घट्ट चिकटून राहावा म्हणून भाविणी प्रयत्न करतात. त्यांना जीव लावतात. मात्र भाविणींच्या आहारी गेलेल्या एखाद्या पुरुषाच्या पत्नीचे जीवनच अतिशय वाईट बनते. हा ही एक महत्वाचा सामाजिक प्रश्न आहे. हा प्रश्न भावीण जीवनाशी अतिशय जवळून संबंधित आहे हे विचारात घेण्यासारखे आहे. म्हणजे आपल्याला आधार मिळविण्यासाठी अगतिकपणे धडपडणा–या भाविणी समाजातील इतर स्त्रियांचा आधार तोडत असतात. तो आपल्या हुषारीने ओढून घेत असतात. कारण त्या परिस्थितीनेच असहाय आणि अगतिक बनलेल्या असतात. त्या चाकोरीबध्द परंपरागत जीवनाशी बांधील असतात. अशा गोष्टीत त्यांना कोणतेच पाप वाटत नाही. कारण त्यांच्या धर्मानेच त्यांना अशा प्रकारचे जीवन दिलेले आहे.

मात्र भाविणीच्या आहारी गेलेल्या पुरुषाच्या पत्नीचे जीवन अतिशय कारुण्याने व्यापलेले असते. या कादंबरीतील बाबुलचा मामा कल्याणीच्या आहारी गेलेला आहे. कल्याणीच्या घरी तिच्या सहवासात तो अगदी हसत खेळत असतो हे कल्याणीच्याच वक्तव्यावरुन समजते. मात्र तो आपल्या वाडयात एखाद्या घुम्यासारखा वागतो. मामीशी चुकूनही बोलत नाही किंवा तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाही. मामी अगदी अंधारातच चाचपडत जगत असते. आयुष्य अगदी निरर्थक रेटत असते. पूर्णपणे ती अस्वस्थ असते. म्हणूनच अगदी शेवटी त्राग्याने ती बाबुलला म्हणते, " भावीण ठेवण्यापेक्षा केलेली बरी. " म्हणजे एकाच वेळी दोन स्त्रियांच्या होणा–या मानसिक कोंडमा–यातून एखादीची तरी सुटका होईल, असेच तिला वाटते. हा तिचा विचार अगदी प्रामाणिकपणाने आणि तिच्या स्वतःच्या जीवनानुभवातूनच बाहेर आला आहे. पण पुढे बाबुल देवाधर्माचे नाव पुढे करतो. देवाधर्माच्या आधीन राहून जुन्या विचाराने जगणा–या समाजाविषयी आपले मत तो मुद्दाम नोंदवतो. ते ऐकून मामी एकदम भडकते आणि जुन्या रुढी–परंपरेत अडकल्यामुळेच माणसाच्या आयुष्याचीच

फसगत कशी होते याविषयी आपल्या मनातील खंत व्यक्त करते. अशी खंत व्यक्त करणा–या मामीच्या मनात जुन्या व्यवस्थेविषयीच एक प्रकारची उबग निर्माण झाली आहे, असे वाटते. सुखासमाधानानं जगण्यासाठी, जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी जुन्या रुढी–परंपरेतील टाकाऊ भाग टाकून फेकून द्यावा व सामाजिक दृष्टीने चांगला भाग स्वीकारावा असेच मामीचे विचार आहेत असे वाटते. कारण मामीला सर्व काही हक्कचे असून देखील नसल्यासारखे होते. सामाजिक प्रश्नातून निर्माण झालेल्या परिस्थितीनेच तिचा देखील बळी घेतला होता. म्हणूनच स्वतःच्याच वाडयातील अंधारात एकाकी चाचपडत निरर्थक जीवन ती जगत होती. उदास छायेसारखी वावरत होती.

या कादंबरीतील सर्वच पात्रे आपापल्या जीवनाचा डाव हरवल्यासारखी निरर्थकपणे जगत आहेत. जयवंत दळवींची ही कादंबरी एक मोठा सामाजिक आशय प्रचंड ताकदीने आपल्यापुढे उभा करीत आहे. या कादंबरीतील कल्याणी ही भावीण परंपरेत अडकून नियतीला शरण गेलेली आहे. परंपरेने माथी मारलेले जीवन जगण्यातच तिला पुण्य दिसते. हे जीवन फेकून देऊन, चाकोरी सोडून वेगळया वाटेने गेले तर आपल्या हातून फार मोठे पापकर्म घडेल असे तिला वाटते. म्हणूनच आहे त्या परिस्थितीत आपले पारंपरिक जीवन प्रामाणिकपणे जगते आहे. आपल्या आईकडून चालत आलेली आपली परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी आपले अस्तित्वच जणू काही ती आपली मुलगी महानंदा हिच्यात शोधते आणि तिलाही हे परंपरागत चाकोरीबध्द जीवन जगण्यास भाग पाडते. खरे पाहता भावीणकन्या महानंदेला परंपरेने चालत आलेल्या या जीवनाचा खूप तिटकारा आहे. तिला हे जीवन नको झाले आहे म्हणूनच बाबुलसारख्या तरुणाशी लग्न करुन या परंपरागत सामाजिक चौकटीचा उंबरठा ओलांडण्याचे धाडस ती दाखवते पण त्यात ती यशस्वी ठरत नाही. कारण ती देखील आपल्या आईप्रमाणेच निमोण झालेल्या परिस्थितीला शरण गेली आहे. तरीही आपल्या मनातून परिवर्तनाला ती पक्की असल्यामुळे नाऊमेद झालेली नाही. म्हणूनच बाबूलपासून झालेल्या दमयंतीला ती जपून वाढवते. आपल्याप्रमाणेच परंपरेचा ती बळी ठरु नये म्हणून काळजी घेते. जगण्यासाठी आपल्यासमोर इतर कोणताही पर्याय नसल्यामुळेच ती आपले शरीर मनाविरुध्द परस्वाधीन करते. कारण ती अगतिक, असहाय आहे.

आकाराने छोटी असणारी ही कादंबरी गुणवत्तेच्या दृष्टीने खूपच मोठी आहे. समाजात परंपरेने चालत आलेल्या काही अनिष्ट रुढी, प्रथा किती भयानक असतात आणि माणसाच्या मनाला

त्यांनी किती घट्ट धरुन ठेवलेले असते हे या कादंबरीतून समजत जाते. किंबहुना परंपरेने चालत आलेल्या जुन्या वाईट प्रथा मोडून टाकण्याचे व प्रस्थापित व्यवस्थेला बदलून टाकून समाजात चांगले विचार रुजविण्याचे, माणसाला माणूस म्हणून जगू देण्याचे सूचनच या कादंबरीतून झाले आहे. ती एक सामाजिक आणि सार्वत्रिक प्रतिक्रिया आहे. कारण बदलत्या कालमानाप्रमाणे समाजातील जुन्या वाईट प्रथा आता अस्तंगत होत आहेत. सामाजिक पातळीवर अस्तित्वात असणा-या अशा प्रथांचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे, असा विचार वाचकांच्या मनात या कादंबरीच्या वाचनानंतर येतो. धर्मांच्या नावाखाली कोणतीही वाईट गोष्ट या समाजात खपवली जाऊ नये. किंवा तिचा स्वीकारही करु नये. तसे करणा-याची जीवनात प्रगती होत नाही, असेच येथे दिसते. म्हणूनच पाप - पुण्याच्या कल्पनेत अडकून भावीण धर्माशी चिकटून असणारी कल्याणी भावीण आपल्या ऐन तारुण्यात स्वतःच्या सौंदर्याने अनेकांना वेड लावत होती. पण वय उतरणीला लागल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे तिला वेड लागले आहे. मात्र भाविणीच्या या परंपरागत व्यवसायातून सुरुवातीपासून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा असणारी महानंदा परिस्थितीने फसली आहे पण संपली नाही. बाबुलपासून तिच्यापोटी जन्मलेल्या दमयंतीला तिने जपून वाढविले आहे. भावीण जीवनाची तिच्यावर सावलीही पडू दिलेली नाही. योग्य वेळ येताच तिने तिला बाबुलच्या स्वाधीन केले आहे. एका सुंदर तरुण मुलीची भावीण जीवनातून सुटका करुन तिच्या मनाची होरपळ होऊ दिलेली नाही. हे तिचे फार मोठे कार्य आहे. परंपरागत चालत आलेली अनिष्ट प्रथा मोडण्याचे नेमके हेच सूचन या कादंबरीतून घडले आहे. समाजातील प्रचलित वाईट व्यवस्था मोडीत काढण्यासाठी नव्या काळातील ही एक महत्वाची सामाजिक प्रतिक्रिया आहे हे निश्चित. तिचे नेतृत्व अशा समाजातीलच मानसिक कोंडमा-यात जगणा-या तडफदार महानंदेसारख्या तरुणीकडे येते.

दळवींच्या या कादंबरीची गुणवत्ता फार मोठी आहे असे जे म्हटले आहे ते याचमुळे. प्रादेशिक पातळीवर अस्तित्वात असलेली एक समाजव्यवस्था आणि तिचे अंतःपदर त्यांनी नेमकेपणाने उलगडून दाखविण्याचे काम केले. प्रस्थापित जुन्या आणि चिवट समाजव्यवस्थे विरुध्द, भावीण धर्माविरुध्द संघर्षसिद्ध . बनलेल्या महानंदा आणि बाबुलसारख्या तरुणांचे उदात्त प्रेम निस्सीम त्यागामुळेच येथे फळाला आले आहे. विशिष्ट परिस्थितीत सापडल्यामुळे त्यांच्या आयुष्याची फरपट आणि भावनांची होरपळ झाली आहे हे खरे. पण अखेरपर्यंत ते दोघेही आपल्या भूमिकेशी अविचल

आणि ठाम राहिले आहेत. प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी अशीच भूमिका आवश्यक ठरते.

जयवंत दळवी यांनी आपल्या या कादंबरीतून कोकणातील भावीण जीवन पध्दत आणि त्यात आढळून येणारे कारुण्य नेमक्या आणि आशयघन शब्दात आपल्यासमोर उभे केले आहे. आवश्यक त्या ठिकाणी कोकणी बोलीभाषेचा चपखल वापर करुन त्यांनी सुंदर वातावरण निर्मिती साधली आहे. अन्यत्र वापरलेल्या प्रमाणभाषेमुळे प्रादेशिक कादंबरीच्या रचनेत कोणताच अडथळा येत नाही. उलट कादंबरीतील आशय वाचकांपर्यंत नेमकेपणाने पोचण्यास त्याची मदत झाली आहे. शिवाय अल्पाक्षर रमणीय भाषाशैलीतील ही कादंबरी काव्यात्म उतरली आहे पण तिच्यातील सामाजिक आशयापासून ती तसूभरही ढळत नाही, हे या कादंबरीचे मोठे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

× संदर्भ ×


| | | |
|---|---|---|
| 1) | दळवी, जयवंत | ' मी आणि माझी साहित्य निर्मिती ', ललित दिवाळी अंक ( 1990 ), पृष्ठे - 51 व 53. |
| 2) | दळवी, जयवंत | ' माझ्या लेखनातील स्त्री ', राजस दिवाळी अंक ( 1981 ), पृ. 4. |
| 3) | तत्रैव | पृ.4. |
| 4) | हातकणंगलेकर, म.द. | ' ललित शिफारस ', आवृत्ती - 1, मॅजिस्टिक प्रकाशन, 1990, पृ.71. |
| 5) | कुलकर्णी, मदन | ' मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप ', आवृत्ती - 1, मंगेश प्रकाशन, नागपूर, 1984, पृ.105. |
| 6) | तत्रैव | पृ. 255. |
| 7) | तत्रैव | पृ. 154. |